# <u>विभाग ४(१)(b)(xiv)</u>

## कार्य करण्याकरिता ठरविण्यात आलेली प्रमाणके

प्रमुख अभियंता (विकास नियोजन) खात्याची खालील नमूद केलेली माहिती ईलेक्ट्रॉनिक्स पध्दतीमध्ये उपलब्ध आहे.

| अ.क्र. | नस्ती / नोंदवह्या यांचे प्रकार | उप प्रकार | संगणकीय फाईल्स प्रकार | संकेतस्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | टिडीआर मंजुरीची प्रकरणे (भाग) | मंजूर प्रकरणे | -pdf, -tift | www.autodcr.mcgm.gov.in (मे २०२१ पासून पुढे) |

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत सदर अधिनियमाच्या पुढील कलमांनुसार मंजूर विकास आराखड्यांतर्गत आरक्षित असलेल्या जमिनीकरिता खरेदी सूचना बजावण्याची तरतूद आहे.**

**अ)** **<u>महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४९-</u>**

मंजूर विकास आराखड्यांतर्गत आरक्षित असलेली कोणतीही जमीन, जी आरक्षित असल्यामुळे मालकाला विकासाकरिता परवानगी नाकारली आहे, अशा जमिनीकरिता जमीनमालक अधिनियमाच्या सदर कलमान्वये खरेदी सूचना बजावू शकतो. ही सूचना या नियमावलीनुसार विहित केलेल्या कालावधीत व पध्दतीने दिलेली असावी ज्यामध्ये जमिनीच्या विद्यमान स्थितीत जमिनीचा योग्य असा लाभकारी वापर शक्य नाही, हे नमूद केलेले असावे. या कलमानुसार, राज्य शासनाच्या नगर विकास खात्यावर खरेदी सूचना मिळाल्यानंतर, राज्य शासन नियोजन प्राधिकरणाचे म्हणजे आपल्याबाबतीत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अभिप्राय मागवितात. बृहन्मुंबई महानगरपालिका संबंधीत प्रकरण तपासून, खरेदी सूचना निश्चित करायची आहे की नाकारावयाची आहे याबाबत अभिप्राय देते.

नियोजन प्राधिकरणाकडून म्हणजे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर आणि बाधित पक्षकारांना सुनावणी दिल्यानंतर राज्य शासन खरेदी सूचना निश्चित करावयाची आहे की नाही हे ठरविते. या अधिनियमाच्या सदर कलमाच्या तरतुदीनुसार अशी खरेदी सूचना, खरेदी सूचनेच्या तारखेपासून ६ महिन्याच्या आत निश्चित करावी लागते किंवा नाकारावी लागते. अन्यथा (तसे न केल्यास) खरेदी सूचना निश्चित असल्याचे समजले जाते. जर राज्य शासनाने खरेदी सूचना निश्चित करण्याचे ठरविले तर पक्षकारांना खरेदी सूचना निश्चित करण्याबाबत कळविले जाते. ज्याची

एक प्रत बृहन्मुंबई महानगरपालिकेला पाठविली जाते.

**ब) <u>महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७-</u>**

अधिनियमाच्या सदर कलमाच्या तरतुदीनुसार, मंजूर विकास आराखड्यात कोणत्याही उद्दिष्टांकरिता, आरक्षित वितरीत अथवा नामनिर्देशित केलेली जमीन अंतिम विकास आराखडा कार्यान्वित झाल्याच्या तारखेपासून १० वर्षाच्या आत संपादन केली नाही तर जमिनीचे मालक अथवा जमिनीत हितसंबंध असणारी कोणतीही व्यक्ती नियोजन प्राधिकरणावर म्हणजे आपल्या प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेवर 'खरेदी सूचना' बजावू शकते. तदनंतर सुधार समिती / महानगरपालिका यांच्या मंजूरीनंतर, खरेदी सुचना बजावल्याच्या तारखेपासून २४ महिन्यांच्या आत सक्षम प्राधिकरणाकडे सदर प्रस्ताव पाठविला जातो.

मंजूर विकास आराखड्यांतर्गत इतर सार्वजनिक मंडळाकरिता विशिष्ट आरक्षणांची तरतूद केली आहे. जर या आरक्षणांकरिता खरेदी सूचना बजावली तर सदर प्रकरण समुचित प्राधिकरणाकडे निर्णयाकरिता आणि खरेदी सूचना बजावल्याच्या तारखेपासून २४ महिन्यांच्या आत संपादन कार्यवाही सुरु करावी म्हणून पाठविले जाते